# शिकू मराठी आनंदाने

## इयत्ता पहिली

विनामूल्य वितरणासाठी




शिकू मराठी आनंदाने इयत्ता पहिली (इंग्रजी माध्यमासाठी)

• **टेली–मानस कार्यक्रम**

**Tele-MANAS (Tele Mental Health Assistance and Networking Across States) (१४४१६ / १८००–८९–१४४१६)**

राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत 'टेली–मानस' ही केंद्र पुरस्कृत योजना महाराष्ट्र राज्यात ऑक्टोबर २०२२पासून राबवण्यात येत आहे. टेली–मानस कार्यक्रमांतर्गत हेल्पलाईन नंबर १४४१६द्‌वारे मोफत २४ x ७ एकात्मिक आणि सर्वसमावेशक मानसिक आरोग्य सेवा दिली जाते. यामध्ये विविध मानसिक समस्यांकरिता तज्ज्ञांमार्फत उपचार व समुपदेशन करण्यात येते. टेली–मानस हेल्पलाईनवर कॉल केल्यानंतर आपण दिलेली माहिती ही पूर्णत: गोपनीय राहते, त्यामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षक यांनी नि:संकोचपणे आपल्या समस्या व शंका सदर हेल्पलाईन नंबरवर फोन करून सांगाव्यात आणि त्याविषयी मार्गदर्शन मिळवावे. या सुविधेची इतरांनाही मदत घेण्यास सांगावे.

केंद्र शासनाद्‌वारे टेली–मानस ॲप सुरू करण्यात आले असून ते मराठी भाषेमध्ये सुद्‌धा उपलब्ध आहे. या ॲपवर मानसिक आरोग्याबाबत परिपूर्ण माहिती दिलेली आहे. टेली–मानस ॲप (Tele–MANAS) हे नि:शुल्क उपलब्ध करण्यात आले आहे.

सदर पाठ्यपुस्तक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी तयार केलेल्या अभ्यासक्रम व पाठ्यक्रमानुसार तयार करण्यात आलेले असून त्यांचेमार्फत या पाठ्यपुस्तकाची पडताळणी करण्यात आलेली आहे. शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.०४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक १६.०४.२०२५ रोजीच्या सभेमध्ये हे पाठ्यपुस्तक शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ पासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# शिकू मराठी आनंदाने

## इयत्ता पहिली

(इंग्रजी माध्यमांच्या शाळांकरिता)




समग्र शिक्षा

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.

सोबतच्या चौकटीतील Q.R. Code स्मार्टफोनद्वारे स्कॅन केल्यास आपणांस डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील घटकांसंबंधित दृक्, श्राव्य आणि दृक्‌श्राव्य स्वरूपातील अध्ययन–अध्यापन साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२५
पुनर्मुद्रण : २०२६


© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११ ००४.

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.


## मराठी भाषा समिती

**श्री. एकनाथ आव्हाड, अध्यक्ष**
डॉ. चित्रा गवारे, सदस्य
श्रीमती नेहा लगड, सदस्य
श्रीमती प्रणिता लवटे, सदस्य
श्रीमती ज्योती वालझाडे, सदस्य
श्रीमती अनिता दाणे, सदस्य
श्रीमती सुनिता राणे, सदस्य
डॉ. सीमा बडगुजर, सदस्य
श्रीमती मुग्धा घोटणकर, सदस्य
श्रीमती आशाकला कोवे, सदस्य
श्रीमती सिमंतिनी कुळकर्णी, सदस्य
डॉ. संतोषकुमार राठोड, सदस्य
श्री. नारायण शिंदे, सदस्य
श्री. देवीदास गोसावी, सदस्य
श्री. निलेश कवडे, सदस्य
श्री. सुधीर भोईर, सदस्य
श्री. शिवाजी पिटलेवाड, सदस्य
श्री. समाधान शिकेतोड, सदस्य
श्री. गणपत दसपुते, सदस्य
श्रीमती सविता वायळ, सदस्य सचिव


**निर्मिती**

**श्रीमती. मितली शितप**
प्र. मुख्य निर्मिती अधिकारी
**श्री. संदीप आजगांवकर**
निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**
**श्री. सचिन मेहता**
प्र. नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५.

**संयोजन** : **श्रीमती सविता अनिल वायळ**
विशेषाधिकारी, मराठी

**चित्रकार** : मयुरा डफळ, विवेकानंद पाटील

**मुखपृष्ठ** : विवेकानंद पाटील

**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**कागद** : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश** : N/PB/2026-27/Qty.

**मुद्रक** : M/s

# भारताचे संविधान

**उद्देशिका**

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## भारताचे संविधान

**भाग ४ क**

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.
(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.
(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.
(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.
(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.
(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.
(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.
(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.
(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.
(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.
(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।धृ।।

भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१।।

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ।।२।।

# प्रस्तावना

बाल मित्रमैत्रिणींनो,

तुम्ही या वर्षी इयत्ता पहिलीत आलात. तुमचे मनापासून स्वागत. 'शिकू मराठी आनंदाने' इयत्ता पहिली हे मराठीचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना खूप आनंद होत आहे.

इयत्ता पहिलीमध्ये येण्यापूर्वी बालवाटिका स्तरांवर भाषा शिक्षणाच्या अंगाने तुम्हांला काही अक्षरांची तोंडओळख झालेली आहे. काही गाणी, गोष्टी व विविध कृती यांद्वारे तुम्हांला मराठी भाषेचा परिचय झालेला आहे. या पाठ्यपुस्तकातून तुम्हांला चित्रवर्णन, कविता, गोष्टी, चित्रकथा, अक्षरे, स्वरचिन्हे, भाषिक कोडी, भाषिक खेळ व कृती यांसारख्या विविध गोष्टी नव्याने शिकायला मिळणार आहेत. तुमचा भाषा शिक्षणाचा पाया भक्कम होण्यासाठी व तुम्हांला मराठी भाषा चांगल्या रीतीने बोलता, वाचता व लिहिता यावी यादृष्टीने या पाठ्यपुस्तकाची नक्कीच मदत होणार आहे. तुमचे भाषा शिक्षण आनंददायी व रंजक होण्यासाठी या पाठ्यपुस्तकात आशयानुरूप आकर्षक व बोलकी चित्रे देण्यात आलेली आहेत.

या पाठ्यपुस्तकात आठ कविता आहेत. या सर्व कविता तुम्हांला साभिनय व तालासुरात म्हणता येणार आहेत. या कविता म्हणताना तुम्हांला खूप मजा येईल. पाठ्यपुस्तकातील सचित्र असलेल्या वाचन कृती, चित्रकथा, विविध गोष्टी ऐकून व वाचून तुम्हांला धमाल वाटेल. गोष्टी ऐकताना व सांगताना तुम्ही नक्कीच त्यात रमून जाल. पाठ्यपुस्तकातील चित्रे पाहताना तुम्ही त्यातील प्रसंगामध्ये एकरूप होऊन त्यावर भरपूर गप्पा माराल व चर्चा कराल.

पाठ्यपुस्तकातील अक्षरगटांची व वाचन कृतींची ज्या पद्धतीने रचना केलेली आहे त्यातून तुम्ही हळूहळू अक्षरे व स्वरचिन्हे ओळखणार आहात. सचित्र अशा वाचन कृतींची रचना व मांडणी तुम्हांला नक्कीच आवडेल. अक्षरे शिकताना चित्रांवरून शब्द ओळखणे, शब्दांतील सारखे अक्षर ओळखणे, अक्षर गिरवणे, अक्षरे लिहिणे अशा सरावांतून एकेक अक्षर व स्वरचिन्हे तुम्हांला शिकायची आहेत. अक्षरांची व स्वरचिन्हांची ओळख झाली, की तुम्ही हळूहळू छोटे छोटे शब्द लिहू शकाल आणि त्यानंतर छोट्या छोट्या वाक्यांची रचना करू शकाल. त्याचबरोबर शब्दांचे अनेक खेळही असणार आहेत. सरावातून आणि खेळत खेळत तुम्ही भाषा शिकणार आहात.

पाठ्यपुस्तकातील या सर्व गोष्टींतून तुमची भाषेची ओळख अधिकाधिक पक्की होत जाणार आहे. पहिल्या वर्षाच्या शेवटी तुम्ही मराठी भाषा नक्कीच छान बोलायला, वाचायला आणि लिहायला शिकणार आहात. बाल मित्रमैत्रिणींनो आनंदाने मराठी शिका, यासाठी तुम्हा सर्वांना मनापासून खूप खूप शुभेच्छा!

**(कृष्णकुमार पाटील)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
**दिनांक :** ३० एप्रिल २०२५
**भारतीय सौर :** १० वैशाख १९४७, अक्षय्यतृतीया

## भाषाविषयक अध्ययन निष्पत्ती : द्‌वितीय भाषा मराठी इयत्ता पहिली

| क्षमता | अध्ययन निष्पत्ती | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ११.१ | • यमक असणारे शब्द ओळखतो.<br>• अनुप्रास ओळखतो. | १५, ४८, ५५, ६४, ७२<br>१, २२, ३४ |
| ११.१.२ | शब्दांतील प्रारंभिक आणि अंतिम अक्षर ओळखतो. | ११, ४५, ६२, ६३ |
| ११.१.३ | साधे शब्द तयार करण्यासाठी २-३ अक्षरध्वनी जोडतो. | १३, १९, २७, ३२, ३८, ४५ |
| ११.२ | शब्दांची ओळख करून त्या अक्षरांशी संबंधित असलेला ध्वनी ओळखतो. | ९, १०, ११, १२, १७, १८, २५, २६, ३०, ३१, ३६, ३७, ४३, ४४, ४९, ५०, ६०, ६६, ६७ |
| ११.२.२ | परिचित असणाऱ्या अक्षरांपासून परिचित शब्द तयार करतो. | २८, ३२, ४६, ६५, ७६ |
| ११.२.३ | सभोवताली आढळणारे दृश्य शब्द, वस्तूंची नावे, शीर्षके ओळखतो. | २, ३, ५, १४, १६, २०, २१, २३, २९, ३३, ३५, ४०, ४१, ४२, ४७, ५६, ५८, ५९, ६८, ७५ |
| ११.२.४ | लहान शब्दांचे श्रुतलेखन करतो. | २७, ३१, ३७, ४५, ५०, ५८, ६१, ६७, ७५ |

- **अध्यापनाद्‌वारे विद्यार्थ्यांकडून वर दिल्याप्रमाणे किमान अध्ययन निष्पत्ती साध्य करून घेणे अनिवार्य आहे. अध्ययन निष्पत्तींच्या समोर दिलेल्या पृष्ठक्रमांकाच्या व्यतिरिक्त इतर पृष्ठक्रमांकांवर दिलेल्या आशयाद्‌वारे देखील इतर अध्ययन निष्पत्ती साध्य होऊ शकतात, असा प्रयत्न शिक्षकांनी करावा.**

## शिक्षक व पालकांसाठी सूचना

राज्यासाठी तयार करण्यात आलेला पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम २०२४ डोळ्यांसमोर ठेवून 'शिकू मराठी आनंदाने' हे द्‌वितीय भाषेचे पाठ्यपुस्तक तयार करण्यात आलेले आहे. अभ्यासक्रमातील द्‌वितीय भाषा इयत्ता पहिलीच्या अध्ययन निष्पत्तींचा विचार करून पाठ्यपुस्तकाची रचना करण्यात आली आहे. इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची गृहभाषा, मातृभाषा व स्थानिक बोलीभाषा वेगवेगळ्या असणार आहेत. त्यामुळे वर्गातील विद्यार्थ्यांच्या या भाषांचा विचार अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील आंतरक्रियेदरम्यान करणे अपेक्षित आहे. पाठ्यपुस्तकामध्ये समाविष्ट करण्यात आलेले पाठ्यघटक आनंददायी, क्रीडायुक्त व अधिकाधिक सरावाच्या कृती यांच्या माध्यमातून घेण्यात यावेत. विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभ होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत.

पाठ्यपुस्तकातील आकर्षक व बोलकी चित्रे, लेखन व वाचनपूर्व तयारीच्या कृती, अक्षर ओळख, अक्षरलेखनाचा सराव, अक्षरगट, चित्रकथा, गोष्टी, कविता, शब्दखेळ, भाषिक खेळ, शब्दकोडी यांसारख्या घटकांचे अध्यापन करताना अधिकाधिक उदाहरणे देणे, प्रश्न विचारणे, शैक्षणिक साहित्याचा वापर करणे, विद्यार्थ्यांच्या शब्द वाचन व लेखनाचा अधिकाधिक सराव घेणे, विद्यार्थ्यांना भाषण-संभाषणासाठी संधी उपलब्ध करून देणे यांसारख्या गोष्टींवर भर देण्यात द्यावा. पाठ्यपुस्तकातील पाठ्यघटकांचे अध्यापन करताना विद्यार्थ्यांना गटांमध्ये चर्चा करण्याची व मते मांडण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. पाठ्यपुस्तकातील शब्द वाचन, लेखन व विविध कृती यांसाठी वापरण्यात आलेल्या विविध प्रतीकांची (इमोजींची) ओळख विद्यार्थ्यांना करून द्यावी.

### चित्रगप्पा

- विद्यार्थ्यांना चित्रासंदर्भात निरीक्षण करण्यास सांगावे. चित्र व शब्द यांची ओळख करून द्यावी. चित्र व शब्द यांची ओळख होण्यासाठी विविध उदाहरणांचा वापर करावा.
- **विद्यार्थ्यांच्या तार्किक शक्तीचा विकास होण्यासाठी चित्रांतील विविध घटकांवर आधारित उपयोजनात्मक प्रश्न विचारावेत, अभिव्यक्त होण्याच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.**

- **दैनंदिन जीवनातील प्रत्यक्षातील अनुभवांची सांगड चित्राशी घालून विद्यार्थ्यांमध्ये समस्या निराकरणाची दृष्टी निर्माण करावी.**

### कविता

- विद्यार्थ्यांना कविता ऐकवाव्यात व म्हणण्यासाठी प्रोत्साहित करावे.
- कविता म्हणताना विद्यार्थी शब्दांचे योग्य उच्चारण करतो का? याकडे विशेष लक्ष द्यावे.
- विद्यार्थ्यांना वर्गामध्ये कविता तालासुरात व साभिनय सादर करण्यासाठी संधी उपलब्ध करून द्याव्यात. गटनिहाय सादरीकरणात सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग घेण्यात यावा.

### अक्षरगट

- वाचनपूर्व तयारी व लेखनपूर्व तयारीकरिता दिलेल्या कृतींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचनाची व लेखनाची ओळख करून द्यावी.
- पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेल्या नऊ अक्षरगटांमधील स्वर, व्यंजने आणि स्वरचिन्हे यांची ओळख, लेखन व सराव या पद्धतीने मुळाक्षरांची ओळख करून द्यावी.
- अक्षरगट झाल्यानंतर गटावर आधारित अक्षरांचे व परिचित शब्दांचे श्रुतलेखन करून घ्यावे.
- **विद्यार्थ्यांच्या अनुवाचन, अनुलेखन व श्रुतलेखनाकडे विशेष लक्ष द्यावे. विद्यार्थ्यांना लेखनात जेथे अडचणी येतील तेथे मार्गदर्शन करावे.**

### वाचन कृती

- नऊ अक्षरगटांवर सचित्र स्वरूपात तयार करण्यात आलेल्या वाचन कृती ह्या विद्यार्थ्यांच्या वाचन व लेखनासाठी उपयुक्त आहेत.
- वाचनासाठी दिलेले चित्रमय पाठ, चित्रकथा, गोष्टी यांचे प्रकट वाचन करावे.
- पाठांमधील चित्रांचे निरीक्षण करण्याची संधी द्यावी व त्यावर अधिकाधिक बोलण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करावे.
- शिक्षकांनी स्पष्ट उच्चार, आवाजातील चढउतार, विरामचिन्हे लक्षात घेऊन योग्य हावभावांसहित गोष्टींचे वाचन करून दाखवावे.
- **विद्यार्थ्यांचा वयोगट, आवड, भावविश्‍व लक्षात घेऊन आकर्षक मोठी चित्रे व कमी मजकूर असणारी गोष्टींची पुस्तके निवडावी.**

### शब्दखेळ

- शब्दसंपत्ती व भाषिक आनंद यासाठी समाविष्ट करण्यात आलेले शब्दखेळ, शब्दकोडी, शब्दशोध पाटी हे घटक विद्यार्थ्यांकडून कृतियुक्त स्वरूपात करून घ्यावेत व त्यांचा अधिकाधिक सराव घ्यावा.

### मातृभाषा

- अभिव्यक्तीसाठी विद्यार्थ्यांनी मातृभाषेचा उपयोग केल्यास त्याचा स्वीकार करावा. मातृभाषेचा स्वीकार करत असताना विद्यार्थ्यांना मराठी प्रमाण भाषेकडे नेण्याच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून द्याव्यात.

## पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेली प्रतीके


**निरीक्षण**


**ऐक.**


**ऐक व म्हण.**


**सांग.**


**वाच.**


**लिही.**


**कृती कर.**


**बैठे खेळ**


**कोडी सोडव.**


**मैदानी खेळ**


**चित्र रंगव.**

# अनुक्रमणिका

## भाग – १


| | | |
|---|---|---|
| १. | आला पाऊस आला (कविता)<br>– शांता शेळके | १ |
| २. | शाळेचा पहिला दिवस (चित्रवर्णन) | २ |
| ३. | मी आणि माझे कुटुंब | ४ |
| ४. | माझी जोडी | ५ |
| ५. | मला घरापर्यंत पोहोचव. | ६ |
| ६. | ठिपके जोड व गिरव. | ७ |
| ७. | अक्षरगट क्र.१ – क म ल अ आ ा | ९ |
| ८. | फरक ओळख. | १४ |
| ९. | असे कसे? (कविता)<br>– राजा मंगळवेढेकर | १५ |
| १०. | ओळख फळांची | १६ |
| ११. | अक्षरगट क्र.२ – घ र ब इ ई ि ी | १७ |


## भाग – २


| | | |
|---|---|---|
| १२. | बैलपोळा (चित्रवर्णन) | २० |
| १३. | झाडे लावू या (कविता) | २२ |
| १४. | ऐक व कृती कर. | २३ |
| १५. | माझे मित्र (पाठ) | २४ |
| १६. | अक्षरगट क्र.३ – न स प त उ ऊ ु ू | २५ |
| १७. | पक्ष्यांचे जग | २९ |
| १८. | अक्षरगट क्र.४ – च ळ ह झ ए े | ३० |
| १९. | बघ व सांग. | ३३ |
| २०. | मोरा रे मोरा (कविता)<br>– सरिता पदकी | ३४ |
| २१. | आम्ही कोठे राहतो? | ३५ |
| २२. | अक्षरगट क्र.५ – द ड व ग ऐ ै | ३६ |
| २३. | सिंह आणि उंदीर (चित्रकथा) | ३९ |


## भाग – ३


| | | |
|---|---|---|
| २४. | खेळ (चित्रवर्णन) | ४० |
| २५. | माझे खेळ | ४२ |
| २६. | अक्षरगट क्र.६ – ध य फ ज श ओ ो | ४३ |
| २७. | प्राण्यांचे जग | ४७ |
| २८. | ससा (कविता)<br>– सुशिला बापट | ४८ |
| २९. | अक्षरगट क्र.७ – ण ख थ भ औ ौ | ४९ |
| ३०. | चिनूची मदत (पाठ) | ५२ |
| ३१. | पाहुणा ओळख. | ५४ |
| ३२. | बाळाचे दोस्त (कविता) | ५५ |
| ३३. | मी आणि माझा जोडीदार | ५६ |
| ३४. | चिमणीची पिल्ले (पाठ) | ५७ |
| ३५. | माझा वर्ग | ५८ |


## भाग – ४


| | | |
|---|---|---|
| ३६. | प्रजासत्ताक दिन (चित्रवर्णन) | ५९ |
| ३७. | अक्षरगट क्र.८ – ट ढ ठ छ ष | ६० |
| ३८. | माझं चित्र (कविता)<br>– संगीता बर्वे | ६४ |
| ३९. | माझे घर | ६५ |
| ४०. | अक्षरगट क्र.९ – क्ष ज्ञ ॲ ऑ अं अः ऋ | ६६ |
| ४१. | मुळाक्षरे | ६९ |
| ४२. | चौदाखडी | ७० |
| ४३. | पानं (कविता)<br>– सुनीता नागपूरकर | ७२ |
| ४४. | भाज्या व फळे | ७३ |
| ४५. | ओळख भाज्यांची | ७५ |
| ४६. | माझी ओळख | ७६ |

विनामूल्य वितरणासाठी



# १. आला पाऊस आला



ऐक व म्हण.



पाऊस पडतो, सर सर सर
घरी चला रे, भर भर भर!

पाऊस वाजे, धडाड् धूम
धावा, धावा ठोका धूम!

धावता, धावता गाठले घर
पड रे पावसा दिवसभर!

पड रे पावसा, चिडून चिडून
आईच्या कुशीत, बसलो दडून!

– शांता शेळके



सूचना : विद्यार्थ्यांना कविता ऐकवावी. विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरात व साभिनय सादर करून घ्यावी. विद्यार्थ्यांकडून सर सर सर, भर भर भर यांसारख्या अनुप्रास शब्दांचा सराव करून घ्यावा.

# २. शाळेचा पहिला दिवस

चित्रे बघ व सांग.












**सूचना :** विद्यार्थ्यांना दिलेल्या चित्रांचे बारकाईने निरीक्षण करण्यास सांगावे. त्यासाठी त्यांना पुरेसा वेळ द्यावा. चित्रांमधील वस्तू, व्यक्ती यांची ओळख करून द्यावी. चित्राविषयी बोलताना विद्यार्थ्यांच्या मातृभाषेचा स्वीकार करावा.

# ३. मी आणि माझे कुटुंब





सीमा तिच्या कुटुंबाची ओळख करून देत आहे. ऐक व म्हण.

मी सीमा.

हा माझा लहान भाऊ. त्याचे नाव किशोर.

ही माझी आई. तिचे नाव मीना.

हे माझे वडील. त्यांचे नाव रमेश.

ही माझी आजी. तिचे नाव राधाबाई.

हे माझे आजोबा. त्यांचे नाव शामराव.





चित्रे ओळख. त्यांची नावे बघ. ऐक व म्हण.



मी



भाऊ



आई



वडील



आजी



आजोबा

**सूचना :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. विद्यार्थ्यांना चित्राची ओळख करून द्यावी. चित्र ओळख करून देताना चित्राकडे बोट दाखवत एकेक वाक्य वाचावे व विद्यार्थ्यांना मागून म्हणायला सांगावे. विद्यार्थ्यांना त्यांच्या कुटुंबाची ओळख सांगण्याबाबत प्रोत्साहन द्यावे.

# ४. माझी जोडी



चित्रे बघ, ओळख व नावे सांग.

   

- चित्रे बघ, चित्राचे नाव ओळख व चित्रांखालील नावे पाहा.

   

| | | | |
|---|---|---|---|
| कढई | आंबा | गुलाब | पालक |



चित्रे बघ, चित्राचे नाव ओळख व जोडी लाव.

   

गुलाब आंबा पालक कढई

- सारखी नावे ओळख, जोडी लाव व नावे सांग.

| | | | |
|---|---|---|---|
| गुलाब | आंबा | कढई | पालक |
| पालक | आंबा | गुलाब | कढई |

**सूचना :** विद्यार्थ्यांना चित्र व शब्दपट्ट्या यांचा वापर करून वस्तू व नावे यांची ओळख करून द्यावी. उत्तरे स्वीकारताना विद्यार्थ्यांच्या मातृभाषेचा स्वीकार करावा. चित्र व शब्दपट्ट्या यांचा वापर करून वस्तू व नावे ओळखण्याचा सराव करून घ्यावा.

# ५. मला घरापर्यंत पोहोचव.



## मार्गावरून बोट फिरव. गिरव.











**सूचना :** विद्यार्थ्यांना दिलेल्या आकारांवरून बोट फिरवण्यास सांगावे. तसेच आकार गिरवण्यास सांगावे. यांसारख्या विविध कृती करून घेऊन विद्यार्थ्यांची वाचनपूर्व, लेखनपूर्व तयारी करून घ्यावी. वरील कृतीप्रमाणे बोटाच्या साहाय्याने आकार गिरवण्याचा सराव करून घ्यावा.

# ६. ठिपके जोड व गिरव.



बघ. गिरव व काढ.











**सूचना :** विद्यार्थ्यांकडून पेन्सिलच्या साहाय्याने ठिपके जोडून आकार गिरवून घ्यावेत. वरीलप्रमाणे आकार गिरवण्याचा सराव करून घ्यावा.





**ठिपके जोडून चित्र पूर्ण कर व रंग भर.**



**सूचना :** विद्यार्थ्यांना ठिपक्यांवर पेन्सिलीने गिरवण्यास सांगावे. उरलेल्या जागी आधीप्रमाणे गिरवण्याचा सराव करून घ्यावा. तसेच वही, पाटी, धूळपाटी यांच्या साहाय्याने गिरवण्याचा भरपूर सराव करून घ्यावा.

# ७. क म ल अ आ ा



## चित्रे बघ, ऐक व म्हण.












कप कढई कपाट केळी



## ‘क’ आवाज ऐक. ‘क’ अक्षर पाहा. ‘क’ अक्षराला ◯ कर.




- ## गिरव, लिही व म्हण.



क क क क क क क क

क

**सूचना :** विद्यार्थ्यांकडून ‘क’ आवाजाचे शब्द विचारून घ्यावेत. त्यांनी सांगितलेले शब्द फलकावर लिहावेत. त्या शब्दांमधील ‘क’ अक्षराला गोल करण्यास सांगावे. विद्यार्थ्यांच्या अक्षरांच्या दृढीकरणासाठी अक्षर हवेत गिरवणे, धूळपाटीवर, रांगोळीवर गिरवणे, मोठ्या अक्षरावर बिया, चिंचोके, खडू इत्यादी ठेवण्याच्या कृती घ्याव्यात. परिसरातील विविध पाट्यांवरील शब्दांमध्ये असणारी अक्षरे ओळखणे तसेच वर्तमानपत्रातील शब्दांमध्ये ‘क’ असणाऱ्या अक्षराला गोल करणे यांसारख्या विविध कृती करून घ्याव्यात. वर्णमालेतील सर्व अक्षरांची ओळख करून देताना या प्रकारच्या विविध कृती करून घ्याव्यात.



## चित्रे बघ, ऐक व म्हण.

# म



मणी



मगर



माठ



मोर



## 'म' आवाज ऐक. 'म' अक्षर पाहा. 'म' अक्षराला ◯ कर.




- ## गिरव, लिही व म्हण.



म म म म म म म म म म

**सूचना :** विद्यार्थ्यांकडून 'म' आवाजाचे शब्द विचारून घ्यावेत. त्यांनी सांगितलेले शब्द फलकावर लिहावेत. त्या शब्दांमधील 'म' अक्षराला गोल करण्यास सांगावे. विद्यार्थ्यांच्या अक्षरांच्या दृढीकरणासाठी अक्षर हवेत गिरवणे, धूळपाटीवर, रांगोळीवर गिरवणे, मोठ्या अक्षरावर बिया, चिंचोके, खडू इत्यादी ठेवण्याच्या कृती घ्याव्यात. परिसरातील विविध पाट्यांवरील शब्दांमध्ये असणारी अक्षरे ओळखणे तसेच वर्तमानपत्रातील शब्दांमध्ये 'म' असणाऱ्या अक्षराला गोल करणे यांसारख्या विविध कृती करून घ्याव्यात. वर्णमालेतील सर्व अक्षरांची ओळख करून देताना या प्रकारच्या विविध कृती करून घ्याव्यात.



## चित्रे बघ, ऐक व म्हण.

# ल



लसूण



लाडू



लेझीम



लिंबू



## 'ल' आवाज ऐक. 'ल' अक्षर पाहा. 'ल' अक्षराला ○ कर.



वेल



बैल



लेखणी



पाल

- गिरव, लिही व म्हण.

ल ल ल ल ल ल ल ल ल ल

ल

**सूचना :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'ल' या ध्वनीची ओळख करून द्यावी. शब्दातील 'ल' अक्षर ओळखून त्याला गोल करण्याचा सराव करून घ्यावा. शब्दांतील 'ल' हे प्रारंभिक व अंतिम अक्षर ओळखण्यास सांगावे. वरील कृतींचा अधिक सराव करून घ्यावा.



चित्रे बघ, ऐक व म्हण.

• गिरव, लिही व म्हण.

अ



अननस



अजगर

अ अ अ अ
अ

आ



आई



आवळा

आ आ आ आ
आ



'अ', 'आ' आवाज ऐक. 'अ', 'आ' अक्षरे पाहा. 'अ', 'आ' अक्षरांना ◯ कर.

अक्षर  अमर  अळी  आरसा  आजोबा



चित्रे बघ, ऐक व म्हण.

ा

म | ा | म ा → म ा → मा









शब्द वाच व लिही.

काम ..................  मामा ..................  काका ..................

**सूचना :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'अ' व 'आ' ध्वनींची ओळख करून द्यावी. 'अ' व 'आ' या अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा. तसेच या अक्षरगटातील अक्षरे व स्वरचिन्ह यांपासून तयार होणाऱ्या परिचित शब्दांचे अनुलेखन करून घ्यावे. वरील कृतींचा सराव करून घ्यावा.

ऐक व वाच.






ऐक व जोड.

क



मका

म



कढई

ल



आवळा

आ



लसूण

**सूचना :** विद्यार्थ्यांना ध्वनी व शब्द ऐकवावेत. जोड्या लावण्यास मदत करावी. दोन-तीन अक्षरध्वनी जोडून शब्द तयार करण्यास मदत करावी.

# ८. फरक ओळख.

## दोन्ही चित्रांतील फरक ओळख व सांग.





**सूचना :** विद्यार्थ्यांना दोन्ही चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. दोन्ही चित्रांमधील फरक ओळखण्यास सांगावे.

# ९. असे कसे?



ऐक व म्हण.



असे कसे? असे **कसे**?
रात्रीचेच चांदणे **दिसे**!

असे कसे? असे **कसे**?
मोरालाच सुंदर **पिसे**!



असे कसे? असे **कसे**?
पाण्यातच झोपती **मासे**!

असे कसे? असे **कसे**?
आईसारखे कुणी **नसे**!

– राजा मंगळवेढेकर







ऐक व म्हण.

कसे – दिसे | कसे – पिसे | कसे – मासे | कसे – नसे

**सूचना :** विद्यार्थ्यांना कविता ऐकवावी. विद्यार्थ्यांकडून वरील कविता तालासुरात व साभिनय सादर करून घ्यावी. यमक जुळणारे शब्द ओळखण्यास सांगावेत व म्हणून घ्यावेत. विद्यार्थ्यांकडून वरील कवितेचे वैयक्तिक व सामूहिक स्वरूपात गायन करून घ्यावे.

# १०. ओळख फळांची



चित्र बघ. रेघेने जोड.



केळीचे झाड



नारळ



नारळाचे झाड



केळी



पपईचे झाड



आंबा



आंब्याचे झाड



पपई

**सूचना :** विद्यार्थ्यांना परिचित झाडे व त्यांपासून मिळणारी फळे यांची ओळख करून द्यावी. झाडे व त्यांपासून मिळणारी फळे यांच्या योग्य जोड्या लावण्यास सांगावे. वरीलप्रमाणे विविध कृती घेऊन विद्यार्थ्यांचा सराव करून घ्यावा.

# ११. घ र ब इ ई ि ी



चित्रे बघ, ऐक व म्हण.

घ



घर

र



रवी

ब



बगळा



‘घ’, ‘र’, ‘ब’ आवाज ऐक. ‘घ’, ‘र’, ‘ब’ अक्षरे पाहा. ‘घ’, ‘र’, ‘ब’ अक्षरांना ☐ कर.




- गिरव, लिही व म्हण.

घ घ घ घ घ घ घ

र र र र र र र

ब ब ब ब ब ब ब

**सूचना :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील ‘घ’, ‘र’, ‘ब’ ध्वनींची ओळख करून द्यावी. ‘घ’, ‘र’, ‘ब’ अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.



चित्रे बघ, ऐक व म्हण.






इडली



इस्त्री






ईडलिंबू



कढई



'इ', 'ई' आवाज ऐक. 'इ', 'ई' अक्षरे पाहा. 'इ', 'ई' अक्षरांना ☐ कर.




- गिरव, लिही व म्हण.











**सूचना :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'इ', 'ई' ध्वनींची ओळख करून द्यावी. 'इ', 'ई' अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.

ऐक व म्हण.

ि



ी



ि म → ि म → मि ..मिरची..

र ी → र ी → री ..बकरी..

ऐक, म्हण व ि, ी गिरव.

..रिमा..

..काकी..




..मामी..

..बकरी..

ऐक व म्हण.



रिमा आली.
अली आला.
मामी आली.
काकी आली.
मामी बकरी बघ.



**सूचना :** विद्यार्थ्यांकडून आतापर्यंत शिकवलेल्या सर्व अक्षरांना ‘ ि ’, ‘ ी ’ ही स्वरचिन्हे जोडून लेखनाचा सराव घ्यावा. तसेच ही स्वरचिन्हे जोडून शब्द तयार करण्यास सांगावे. वरील कृतींचा विद्यार्थ्यांकडून सराव करून घ्यावा.

चित्र बघ व सांग.

# १२. बैलपोळा



**सूचना :** विद्यार्थ्यांना दिलेल्या चित्राचे बारकाईने निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रातील वस्तू, प्राणी यांच्या नावांची ओळख करून द्यावी. चित्राविषयी विद्यार्थ्यांशी भरपूर गप्पा माराव्यात. बैलपोळा सणाविषयीची माहिती विद्यार्थ्यांना सांगावी.

विनामूल्य वितरणासाठी



## चित्रे बघ. ऐक व म्हण.



माठ



खांब



ढोल



झाड



खिडकी



बैल

**सूचना :** विद्यार्थ्यांना बैलपोळा या चित्रातील काही चित्रांची ओळख करून द्यावी. चित्रांची नावे मागे म्हणून घ्यावीत. तसेच चित्रात दिसणाऱ्या इतर गोष्टी व वस्तूंची माहिती सांगावी.

# १३. झाडे लावू या



ऐक व म्हण.



इकडे झाडे, तिकडे झाडे,
जिकडे तिकडे झाडेच झाडे.

इकडे पाने, तिकडे पाने,
जिकडे तिकडे पानेच पाने.

इकडे फुले, तिकडे फुले,
जिकडे तिकडे फुलेच फुले.

इकडे फळे, तिकडे फळे,
जिकडे तिकडे फळेच फळे.

झाडेच झाडे लावू या.
फळेच फळे खाऊ या.



तुझ्या आवडीच्या फळा-फुलांची चित्रे जमव व चिकटव.

**सूचना :** विद्यार्थ्यांना कविता ऐकवावी. विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक व सामूहिक स्वरूपात कविता तालासुरात व साभिनय म्हणून घ्यावी. अनुप्रासाची ओळख करून द्यावी. विविध कवितांच्या माध्यमातून अनुप्रास ओळखण्यास प्रोत्साहित करावे.



# १४. ऐक व कृती कर.







हस. | पळ. | वाच.







खा. | बस. | लिही.







रड. | उभी राहा. | उडी मार.

**सूचना :** विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांत कोण काय करते आहे ते विचारावे. चित्रांप्रमाणे क्रिया करण्यास सांगाव्यात. चित्रांखालील शब्द मुलांना पाहण्यास सांगावेत. चित्रांखालील शब्द वाचून दाखवावेत. वरीलप्रमाणे प्रत्येक चित्रांतील क्रिया ओळखण्याचा, क्रिया करण्याचा व क्रियेचे नाव वाचण्याचा सराव घ्यावा. अशा प्रकारे विविध कृती विद्यार्थ्यांकडून करून घ्याव्यात.

# १५. माझे मित्र



ऐक व म्हण.



मला खूप मित्र आहेत.



माझे काही मित्र लहान आहेत.



माझ्या काही मित्रांना पंख आहेत.



माझ्या काही मित्रांना शेपट्या आहेत.



झाडेही माझे मित्र आहेत.



पुस्तकेही माझे मित्र आहेत.

## तुझ्या मित्रांची नावे सांग.

**सूचना :** विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्राखाली दिलेली वाक्ये मागे म्हणण्यास सांगावीत. विद्यार्थ्यांना स्वत:च्या मित्रांची नावे विचारावीत. तसेच मित्रांविषयी माहिती सांगण्यास प्रेरित करावे. मित्रांबरोबरचे अनुभव व्यक्त करण्याची संधी द्यावी.

# १६. न स प त उ ऊ ु ू



चित्रे बघ, ऐक व म्हण.

न स प त



नळ



समई



पतंग



तबला



'न', 'स', 'प', 'त' आवाज ऐक. 'न', 'स', 'प', 'त' अक्षरे पाहा. 'न', 'स', 'प', 'त' अक्षरांना ◯ कर.



नख



ससा



पाटी



तराजू

- गिरव, लिही व म्हण.

न न न न न न

स स स स स स

प प प प प प प

त त त त त त त

**सूचना :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'न', 'स', 'प', 'त' ध्वनींची ओळख करून द्यावी. 'न', 'स', 'प', 'त' अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.



चित्रे बघ, ऐक व म्हण.

उ





उशी उंट

ऊ





ऊस पाऊस



'उ', 'ऊ' आवाज ऐक. 'उ', 'ऊ' अक्षरे पाहा. 'उ', 'ऊ' अक्षरांना ◯ कर.




- गिरव, लिही व म्हण.

उ उ उ उ उ उ उ उ उ उ

उ

ऊ ऊ ऊ ऊ ऊ ऊ ऊ ऊ ऊ ऊ

ऊ

**सूचना :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'उ', 'ऊ' ध्वनींची ओळख करून द्यावी. 'उ', 'ऊ' अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.

## बघ, वाच, लिही.

ु

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कु | कु | कु | मु | मु | ......... |
| लु | लु | ......... | घु | ......... | ......... |

## बघ, वाच, लिही.

ू

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बू | बू | बू | नू | नू | ......... |
| सू | सू | ......... | पू | पू | ......... |

## गिरव व लिही.

| ु | रु | रु | ......... |
|---|---|---|---|

| ू | रू | रू | ......... |
|---|---|---|---|

- ‘ ु ’ व ‘ ू ’ जोडून शब्द पुन्हा लिही.

पुरी ........... सुका ........... रुमाल ........... पूल ...........

## ऐक व म्हण.



ऊस बघ.
उमा ऊस बघ.
रमा ऊस बघ.
अनिल ऊस बघ.



**सूचना :** झालेल्या अक्षरगटांतील अक्षरांचा व स्वरचिन्हांचा उपयोग करून विद्यार्थ्यांकडून शब्द बनवून घ्यावेत व अधिक शब्दांचा सराव घ्यावा. परिचित अक्षरांचे व शब्दांचे श्रुतलेखन करून घ्यावे.



चित्र बघ. चित्रात रंग भर.





गोलातील अक्षरापुढे 'रा' अक्षर जोड. शब्द तयार कर व लिही.




तारा

सूचना : दिलेल्या फुलपाखराच्या चित्रामध्ये रंग भरण्यास सांगावे. साधे शब्द तयार करण्यासाठी अक्षरध्वनी जोडून शब्द तयार करण्याचा सराव घ्यावा.

# १७. पक्ष्यांचे जग



## चित्रे बघ. चित्रासाठी असलेला शब्द रेघेने जोड.



पोपट



मोर



बगळा



बदक



कोंबडा



कावळा



कबुतर



चिमणी

| | |
|---|---|
| | पोपट |
| मोर | |
| | बगळा |
| कावळा | |
| | कबुतर |
| बदक | |
| | कोंबडा |
| चिमणी | |

**सूचना :** विद्यार्थ्यांना चित्रांची ओळख करून द्यावी. पक्ष्यांची नावे वाचून दाखवावीत. चौकटीतील व चौकटीबाहेरील सारखे शब्द ओळखून रेघेने जोडण्यास सांगावे. चित्रांतील पक्ष्यांचा आवाज काढण्याची कृती करून घ्यावी.

## १८. च ळ ह झ ए े

चित्रे बघ, ऐक व म्हण.

च  **च**मचा

ळ  मा**ळ**

ह  **ह**रिण

'च', 'ळ', 'ह' आवाज ऐक. 'च', 'ळ', 'ह' अक्षरे पाहा. 'च', 'ळ', 'ह' अक्षरांना ◯ कर.

 चाक

 केळी

 हात

• गिरव, लिही व म्हण.

च च च च च च च च च च च च

ळ ळ ळ ळ ळ ळ ळ ळ ळ ळ ळ

ह ह ह ह ह ह ह ह ह ह ह ह

सूचना : विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'च', 'ळ', 'ह' ध्वनींची ओळख करून द्यावी. 'च', 'ळ', 'ह' अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.



चित्रे बघ, ऐक व म्हण.






झाड



झोपडी



झोका

- गिरव, लिही व म्हण.




झ झ झ झ झ झ झ झ झ

झ



'ए' आवाज ऐक. 'ए' अक्षर पाहा. 'ए' अक्षराला ◯ कर.






एडका

१

एक




े

प

प प पे पेरू

- गिरव, लिही व म्हण.




ए ए ए ए ए ए ए ए ए

ए



' े ' जोडून लिही व वाच.

जसे – क | के

म मे ल...... घ...... र...... ब...... न......

स...... प...... त...... च...... ळ...... ह...... झ......

**सूचना :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'झ', 'ए' ध्वनींची ओळख करून द्यावी. 'झ', 'ए' अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा. विद्यार्थ्यांना ' े ' या स्वरचिन्हाचा परिचय करून द्यावा. अक्षरांना ' े ' हे स्वरचिन्ह जोडून लेखनाचा सराव घ्यावा. विद्यार्थ्यांकडून परिचित अक्षरांचे व शब्दांचे श्रुतलेखन करून घ्यावे.



## ऐक व म्हण.



हेमा सरबत कर.

चेतन सरबत पी.

नेहा सरबत पी.



## शब्द बघ व लिही.



पेरू



केळी

रेघ



तबेला



## शब्दकोडे पूर्ण कर. सांग व लिही.



| | | |
|---|---|---|
| म | | |
| | | स |
| | | |
| | | ई |





**सूचना :** दिलेल्या वाक्यांचे अनुवाचन करून घ्यावे. साधे शब्द तयार करण्यासाठी अक्षरध्वनी जोडून शब्द तयार करण्याचा सराव घ्यावा. तसेच शब्दांचे अनुलेखन करून घ्यावे. चित्रांचे निरीक्षण करून दिलेले शब्दकोडे पूर्ण करून घ्यावे.



# १९. बघ व सांग.



















**सूचना :** विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांवरून लहान-मोठा, वर-खाली, एक-अनेक, मागे-पुढे, उंच-ठेंगणा, आत-बाहेर या संबोधांची ओळख करून द्यावी. अशा प्रकारे विविध चित्रे व वस्तू दाखवून वरील संबोध स्पष्ट करावेत.

# २०. मोरा रे मोरा

## ऐक व म्हण.

मोरा रे मोरा
काय तुझा तोरा

रंगीत पिसारा
डोक्यावर तुरा

बघ वर बघ
काळे काळे ढग

एक पाय दुमडून
पिसारा फुलवून

नाच तर खरा
मोरा रे मोरा

– सरिता पदकी







## ऐक व म्हण.

| मोरा – तोरा | बघ – ढग |
|---|---|

**सूचना :** विद्यार्थ्यांना कविता ऐकवावी. विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक व सामूहिक स्वरूपात कविता तालासुरात व साभिनय म्हणून घ्यावी. कवितेतील यमक जुळणारे शब्द व अनुप्रास ओळखण्यास सांगावे. विविध कवितांच्या माध्यमातून अनुप्रास ओळखण्यास प्रोत्साहित करावे.

# २१. आम्ही कोठे राहतो ?

चित्र बघ व कोण कोठे राहतो ते सांग.




**सूचना :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रातील प्राणी, पक्षी कोठे राहतात त्यांच्या निवाऱ्यांची ओळख करून द्यावी.

# २२. द ड व ग ऐ ै



चित्रे बघ, ऐक व म्हण.

| द | ड | व | ग |
|---|---|---|---|
|  |  |  |  |
| **द**रवाजा | **ड**मरू | **व**ड | **ग**वत |



शब्दांतील 'द', 'ड', 'व', 'ग' अक्षरे पाहा. गोलातील अक्षरांना जोड.



दप्तर

द ड व ग

डाळिंब





कासव

बाग



- गिरव, लिही व म्हण.

द द द द द द द

ड ड ड ड ड ड

व व व व व व

ग ग ग ग ग ग

**सूचना :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'द', 'ड', 'व', 'ग' ध्वनींची ओळख करून द्यावी. 'द', 'ड', 'व', 'ग' अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.



'ऐ' आवाज ऐक. 'ऐ' अक्षर पाहा. 'ऐ' अक्षराला ◯ कर.






ऐक



ऐरण




ै

क

क कै कै कैरी

- गिरव, लिही व म्हण.

ऐ ऐ ऐ ऐ ऐ ऐ ऐ ऐ ऐ ऐ

ऐ



' ै 'जोडून लिही व वाच.

जसे – क | कै

म मै ल ...... घ ...... र ...... ब ...... न ...... स ...... प ...... त ......

च ...... ळ ...... ह ...... झ ...... द ...... ड ...... व ...... ग ......

- चित्र बघ. चित्रात दाखवल्याप्रमाणे ' ै ' अक्षर दाखव व रेघेने जोड.




**सूचना :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'ऐ' ध्वनीची ओळख करून द्यावी व 'ऐ' अक्षराच्या लेखनाचा सराव करून घ्यावा. विद्यार्थ्यांना ' ै' या स्वरचिन्हाचा परिचय करून द्यावा. अक्षरांना स्वरचिन्ह जोडून सराव घ्यावा. विद्यार्थ्यांकडून परिचित अक्षरांचे व शब्दांचे श्रुतलेखन करून घ्यावे.



ऐक व म्हण.



कैलास बागेत चल.
झाडे लावू.
सावलीत बसू.
पेरू कापू.
आराम करू.



गोलातील अक्षरे बघ. दिलेल्या चित्रांसाठी शब्द तयार कर व लिही.



गुलाब



....................
....................






....................
....................



....................
....................



....................
....................



....................
....................

**सूचना :** साधे शब्द तयार करण्यासाठी अक्षरध्वनी जोडून शब्द तयार करण्याचा सराव घ्यावा.

# २३. सिंह आणि उंदीर

ऐक.










एकमेकांची मदत करू.

**सूचना :** विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. प्रत्येक चित्रात काय घडते आहे ते सांगावे. चित्रकथा समजावून सांगावी.

# २४. खेळ

भाग – ३

चित्र बघ व सांग.






**सूचना :** विद्यार्थ्यांना दिलेल्या चित्राचे बारकाईने निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रातील वस्तूंची व खेळांची ओळख करून द्यावी. चित्राविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करावी. चित्रातील विविध खेळांबाबत चर्चा करावी तसेच गप्पा माराव्यात.

# २५. माझे खेळ



भोवरा



विटीदांडू



कॅरम



फुगडी



लगोरी



लंगडी

**सूचना :** विद्यार्थ्यांना विविध खेळांची नावे वाचून दाखवावीत व म्हणून घ्यावीत. विविध प्रकारचे खेळ मित्रांबरोबर खेळण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

# २६. ध य फ ज श ओ ो



चित्रे बघ, ऐक व म्हण.

ध  य  फ 

धरण — यान — फळा



‘ध’, ‘य’, ‘फ’ आवाज ऐक. ‘ध’, ‘य’, ‘फ’ अक्षरे पाहा. ‘ध’, ‘य’, ‘फ’अक्षरांना □ कर.



धबधबा



याक





फणस



• गिरव, लिही व म्हण.

ध ध ध ध ध ध ध

य य य य य य य

फ फ फ फ फ फ फ

**सूचना :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील ‘ध’, ‘य’, ‘फ’ ध्वनींची ओळख करून द्यावी. ‘ध’, ‘य’, ‘फ’ अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.

चित्रे बघ, नावे सांग व दाखव.

ज  श  ओ 

जहाज शेत ओढणी

'ज', 'श', 'ओ' आवाज ऐक. 'ज', 'श', 'ओ' अक्षरे पाहा. 'ज', 'श', 'ओ' अक्षरांखाली ___ मार.

 जांभूळ  बशी  ओढा

- गिरव, लिही व म्हण.

ज ज ज ज ज ज ज

श श श श श श श

ओ ओ ओ ओ ओ ओ

'ओ' अक्षर शोध. 'ओ' अक्षराखाली रेघ (___) मार.

चे ओ गे ओ के मे ओ

सूचना : विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'ज', 'श', 'ओ' ध्वनींची ओळख करून द्यावी. 'ज', 'श', 'ओ' अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.

## ठिपके दिलेले ‘ो’ स्वरचिन्ह गिरव व शब्द वाच.





मोर



ढोल

## ‘ो’ जोडून लिही व वाच.

जसे – क | को

म मो ल ........ घ ........ र ........ ब ........ न ........ स ........ प ........ त ........ च ........ ळ ........

ह ........ झ ........ द ........ ड ........ व ........ ग ........ ध ........ य ........ फ ........ ज ........ श ........

## चित्र ओळख. शब्द पूर्ण कर.



......हाज



गा......



......क



......सा



झो......



ऊ......

**सूचना :** विद्यार्थ्यांना ‘ो’ या स्वरचिन्हाचा परिचय करून द्यावा. परिचित अक्षरांचे व शब्दांचे श्रुतलेखन करून घ्यावे. शब्दांतील प्रारंभिक व अंतिम अक्षर ओळखून शब्द पूर्ण करण्यास सांगावे. वरील कृतींचा सराव करून घ्यावा.



## ऐक, म्हण व चित्रासाठीचा शब्द चौकटीत लिही.

(१) हे  आहे. ..........

(२) ही  आहे. ..........

(३) हे  आहे. ..........

(४) ही  आहे. ..........

(५) हा  आहे. ..........

(६) ही  आहे. ..........

(७) हे  आहे. ..........

**सूचना :** विद्यार्थ्यांना वाक्य वाचून दाखवावे व मागे म्हणण्यास सांगावे. चित्रासाठीचा शब्द चौकटीत लिहून घ्यावा. वरील कृतींचा अधिक सराव करून घ्यावा.

# २७. प्राण्यांचे जग



### चित्रे बघ, ऐक व म्हण.



**मासा**



**वाघ**



**गाय**



**ससा**



**घोडा**



**बेडूक**



**कुत्रा**



**हरिण**



**सिंह**

**सूचना :** विद्यार्थ्यांना दिलेल्या चित्रांमधील प्राणी ओळखण्यास सांगावे. प्राण्यांच्या चित्रांखालील नावे वाचून दाखवावीत. प्राण्यांची नावे विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावीत. चित्रांमधील प्राण्यांचा आवाज काढण्याची साभिनय कृती करून घ्यावी.

# २८. ससा



ऐक व म्हण.



ससा ससा,
दिसतो **कसा**
कापूस पिंजून,
ठेवलाय **जसा**

लाल लाल,
डोळे **छान**
लहान शेपूट,
मोठे **कान**

पाला खाऊन,
फुगतो **टुम**
चाहूल लागताच,
पळतो **धूम**.

– सुशिला बापट



कवितेतील यमक जुळणारे शब्द लिही.

| कसा | छान | टुम |
| --- | --- | --- |
| ................ | ................ | ................ |
| ................ | ................ | ................ |

**सूचना :** विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक व सामूहिक स्वरूपात कविता तालासुरात व साभिनय म्हणून घ्यावी. यमक जुळणारे शब्द ओळखण्यास सांगावेत. जसे, कसा–जसा. यमक जुळणारे शब्द ओळखून लिहिण्याचा अधिक सराव करून घ्यावा.

# २९. ण ख थ भ औ ौ



चित्रे बघ, ऐक व म्हण.

ण  ख  थ 

पणती

खडू

थवा



'ण', 'ख', 'थ' आवाज ऐक. 'ण', 'ख', 'थ' अक्षरे पाहा. 'ण', 'ख', 'थ' अक्षरांखाली __ मार.

 बाण  खिडकी  रथ

- गिरव, लिही व म्हण.

ण

ख

थ

**सूचना :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'ण', 'ख', 'थ' ध्वनींची ओळख करून द्यावी. 'ण', 'ख', 'थ' अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.



‘भ’, ‘औ’ आवाज ऐक. ‘भ’, ‘औ’ अक्षरे पाहा. ‘भ’, ‘औ’ अक्षरांखाली ___ मार.

भ



भाकरी

औ



औत

• गिरव, लिही व म्हण.

भ भ

औ औ



‘औ’ अक्षर शोध. ‘औ’ अक्षराखाली रेघ (___) मार.

औ बे औ ने औ पे औ



चित्र बघ. शब्द लिही.









**सूचना :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील ‘भ’, ‘औ’ ध्वनींची ओळख करून द्यावी. ‘भ’, ‘औ’ अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा. शिकलेल्या अक्षरांचे व शब्दांचे श्रुतलेखन करून घ्यावे.

ठिपके दिलेले ‘ ौ ’ स्वरचिन्ह गिरव व शब्द वाच.







हौद            औषध

‘ ौ’ जोडून लिही व वाच.

जसे – क | कौ

मौ ल ........ घ ........ र ........ ब ........ न ........ स ........ प ........ त ........ च ........ ळ ........ ह ........ झ ........

द ........ ड ........ व ........ ग ........ ध ........ य ........ फ ........ ज ........ श ........ ण ........ ख ........ थ ........ भ ........

खालील चित्रांच्या, त्यांच्या नावांच्या अक्षरांशी जोड्या लाव.



य





थ

घ





भ

झ

च



सूचना : विद्यार्थ्यांना ‘ ौ ’ या स्वरचिन्हाचा परिचय करून द्यावा. अक्षरांना स्वरचिन्ह जोडून लेखनाचा सराव करून घ्यावा.

# ३०. चिनूची मदत

 ऐक.



बाबा-बाबा, थांबा ना! ते पाहा कुत्र्याचे पिल्लू. त्याला जखम झाली आहे वाटतं.

चिनू, त्याला गाडीचा धक्का लागला असावा. चल, आपण त्याला आपल्या घरी घेऊन जाऊ.





बाबा, बरं झालं. आपण याला घरी घेऊन आलो.
बाबा, याला पाणी प्यायला देऊ आणि औषध लावू.



बाबा, बघा ना, पाणी प्यायल्यामुळे आणि त्याच्या जखमेवर औषध लावल्यामुळे त्याला आता बरं वाटतंय.



चिनू, आता तर तो चालूही शकतो.

**सूचना :** विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांवरून पाठात घडणाऱ्या गोष्टी समजावून सांगाव्यात. पाठाशी संबंधित विविध प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना बोलते करावे.

# ३१. पाहुणा ओळख.



चित्रांतील पाहुणा ओळख. त्याखालील ◯ रंगव.

   

   

   

   

**सूचना :** चित्रे पाहून प्राणी, पक्षी, फळे, भाज्या या गटात न बसणारे चित्र ओळखून चित्राखालील गोल रंगवण्यास सांगावे.

# ३२. बाळाचे दोस्त



ऐक व म्हण.

एक चिऊ आली,
बाळाला पाहून गेली.

एक पोपट आला,
पेरू देऊन गेला.

एक खार आली,
बोर देऊन गेली.

एक पारवा आला,
चिकू देऊन गेला.

एक साळुंकी आली,
आवळा देऊन गेली.

एक कावळा आला,
बाळाभोवती नाचून गेला.





**सूचना :** विद्यार्थ्यांना कविता ऐकवावी. विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरात व साभिनय सादर करून घ्यावी. यमक जुळणारे शब्द ओळखण्यास सांगावेत. जसे, आला-गेला, आली-गेली. यमक जुळणारे शब्द ओळखण्याचा व लेखनाचा अधिक सराव करून घ्यावा.

# ३३. मी आणि माझा जोडीदार



योग्य चित्राची जोडी रेघेने जोड.





फळा

सुपली





पाऊस

खडू





बशी

छत्री





झाडू

कप

# ३४. चिमणीची पिल्ले

## ऐक व म्हण.



एक झाड होते.
तेथे चिमणी राहायची.
तिला दोन पिल्ले होती.



पिल्ले मोठी होत होती.
चिमणीला वाटले त्यांनी उडावे.
तिने पिल्लांना अलगद ढकलले.



पिल्ले घाबरली.
पंखांची फडफड केली.
ती उडू लागली.
चिमणी व पिल्ले आनंदी झाली.

## रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द लिही.

(१) एक .............. होते. (झाड, पान)

(२) तिला .............. पिल्ले होती. (दोन, चार)

**सूचना :** वरील पाठाचे अनुवाचन करून घ्यावे. रिकाम्या जागी योग्य शब्दाची निवड करण्यास मदत करावी.

# ३५. माझा वर्ग






**सांग.**

(१) चित्रातील तुला माहीत असलेल्या वस्तू सांग.

(२) तुझ्या शाळेचे नाव सांग.

(३) तुला शाळेतील कोणकोणत्या गोष्टी आवडतात?

**सूचना :** विद्यार्थ्यांशी वरील चित्रावर आधारित चर्चा करावी. विद्यार्थ्यांकडून परिचित शब्दांचे श्रुतलेखन करून घ्यावे.

चित्र बघ व सांग.

# ३६. प्रजासत्ताक दिन






**सूचना :** विद्यार्थ्यांना दिलेल्या चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. विद्यार्थ्यांना चित्रावर आधारित १ ते २ शब्दांत उत्तर येणारे प्रश्न विचारावेत. उदा. (१) झेंड्यामध्ये किती रंग आहेत? (२) प्रजासत्ताक दिन कधी साजरा केला जातो?

# ३७. ट ढ ठ छ ष



‘ट’, ‘ढ’, ‘ठ’ आवाज ऐक. ‘ट’, ‘ढ’, ‘ठ’ अक्षरे पाहा. ‘ट’, ‘ढ’, ‘ठ’ अक्षरांना ◯ कर.

ट



टरबूज

ढ



ढग

ठ



ठसा

- म्हण व लिही.

ट ट

ढ ढ

ठ ठ



वाच व लिही.



टाळ



कढई



ठोकळा



माळ

**सूचना :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील ‘ट’, ‘ढ’, ‘ठ’ ध्वनींची ओळख करून द्यावी. ‘ट’, ‘ढ’, ‘ठ’ अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.



'छ', 'ष' आवाज ऐक. 'छ', 'ष' अक्षरे पाहा. 'छ', 'ष' अक्षरांना ◯ कर.





छत्री





षट्कोन

- गिरव, लिही व म्हण.

छ छ छ छ छ छ छ छ छ छ

छ

ष ष ष ष ष ष ष ष ष ष ष

ष



चित्र बघ. योग्य चिन्ह जोडून शब्द पूर्ण कर.



घ र



मरच



र माल



काप स



परू



करी



भ वरा



अ षध



**सूचना :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'छ', 'ष' ध्वनींची ओळख करून द्यावी. 'छ', 'ष' अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा. विद्यार्थ्यांकडून परिचित शब्दांचे श्रुतलेखन करून घ्यावे. शब्दांची ओळख करून देऊन त्या अक्षरांना योग्य स्वरचिन्हे जोडण्यास सांगावे. वरील कृतींचा अधिक सराव करून घ्यावा.



## चित्रांच्या जागी योग्य शब्द वापरून वाक्ये मागे म्हण.

हे  आहे. झाडावर ,  व  असे बरेच पक्षी येतात. झाडावर  आहे. झाडाला खूप  आहेत. झाडाला एक  बांधला आहे.  खाली खेळायला खूप मजा येते.



## शब्द म्हण. दिलेल्या अक्षरांचे शब्द पतंगांवर लिही.




**सूचना :** वाक्यातील चित्रांच्या जागी योग्य शब्द वापरून मागे वाक्य म्हणून घ्यावे. शब्दांतील प्रारंभिक आणि अंतिम अक्षर ओळखण्यास सांगावे. ओळखलेले शब्द पतंगावर लिहून घ्यावेत. शब्दांचे वाचन व लेखन करून घ्यावे. तसेच अधिक सराव करून घ्यावा.



## रंग ओळख.



पिवळा हिरवा निळा काळा



गुलाबी लाल केशरी पांढरा



## रंग बघ. जोडी लाव.













## चित्र ओळख. शब्द पूर्ण कर.









.......ग चम....... .......त्री न.......

सूचना : विद्यार्थ्यांना रंगांचा परिचय करून द्यावा. शब्दांतील प्रारंभिक व अंतिम अक्षर ओळखून शब्द लिहिण्यास सांगावे. अधिकचा सराव घ्यावा.

# ३८. माझं चित्र

ऐक व म्हण.

इटुकली चिटुकली
लाल लाल घरं,
लाल लाल घरांची
हिरवी दारं

सापाची पाठ
तशी नागमोडी वाट,
निळ्याशार पाण्याचा
झोकदार काठ

आभाळात काढले
पक्षी चार,
उगवता सूर्य
डोंगराआड

रंगीत फुलांनी
सजलं रान,
पहा माझं चित्र
झालं किनई छान!

– संगीता बर्वे



- यमक जुळणारे शब्द सांग.

जसे– घरं – दारं    रान – ..............    पाठ – ..............

सूचना : विद्यार्थ्यांना कविता ऐकवावी. तसेच कविता तालासुरात व साभिनय म्हणून घ्यावी. यमक जुळणारे शब्द ओळखून लिहिण्याचा सराव करून घ्यावा.

# ३९. माझे घर



### चित्र बघ. चित्रातील घरासंबंधीचे शब्द लिही.

जसे – खिडकी ........................ ........................ ........................ ........................

........................ ........................ ........................ ........................

........................ ........................ ........................ ........................ ........................

........................ ........................ ........................ ........................ ........................

### तुझ्या घरासंबंधीचे शब्द लिही.

........................ ........................ ........................ ........................ ........................

........................ ........................ ........................ ........................ ........................

........................ ........................ ........................ ........................ ........................

........................ ........................ ........................ ........................ ........................

**सूचना :** सभोवताली आढळणारे दृश्य शब्द, वस्तूंची नावे यांविषयी माहिती सांगावी. विद्यार्थ्यांना चित्राशी संबंधित शब्द विचारावेत व लिहून घ्यावेत.

# ४०. क्ष ज्ञ ॲ ऑ अं अः ऋ



चित्रे बघ, ऐक व म्हण.

क्ष



शिक्षक

ज्ञ



विज्ञान



'क्ष', 'ज्ञ' आवाज ऐक. 'क्ष', 'ज्ञ' अक्षरे पाहा. 'क्ष', 'ज्ञ' अक्षरांना ◯ कर.



पक्षी

ज्ञानदा



आज्ञा



रिक्षा

- गिरव, लिही व म्हण.

क्ष क्ष क्ष क्ष क्ष क्ष क्ष क्ष क्ष क्ष क्ष

क्ष

ज्ञ ज्ञ ज्ञ ज्ञ ज्ञ ज्ञ ज्ञ ज्ञ ज्ञ ज्ञ ज्ञ

ज्ञ

**सूचना :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'क्ष', 'ज्ञ' ध्वनींची ओळख करून द्यावी. 'क्ष', 'ज्ञ' अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.



## गिरव, लिही, ऐक व म्हण. सारखा उच्चार असलेले अक्षर रेघेने जोड.

अॅ अॅ अॅ

अॅना बॅग कॅरम कॅमेरा

ऑ ऑ ऑ

ऑगस्ट कॉलेज कॉलर शॉवर

अं अं अं

अंतर अंधार अंबर अंश

अः अः अः

स्वतः शतशः उषःकाल अंशतः

ऋ ऋ ऋ

ऋषी ऋत्विक ऋतुजा ऋचा



## आवाज ऐक, अक्षर बघ व म्हण.

श्र त्र ऌ ङ ञ

**सूचना :** परिचित अक्षरांवर '-ं' चे (अनुस्वाराचे) चिन्ह जोडून वाचण्याचा सराव घ्यावा. अनुनासिकाप्रमाणे उच्चार करून दाखवावेत व उच्चार करून घ्यावेत. या इयत्तेमध्ये 'ऋ', 'ऌ' या स्वरांची आणि 'ङ', 'ञ' या व्यंजनांची तोंडओळख करून द्यावी. तसेच मराठी भाषेमध्ये 'श्र' व 'त्र' ही जोडाक्षरे असून त्याचीही तोंडओळख करून द्यावी. याबाबत वाचनाचा व लेखनाचा आग्रह धरू नये.

# शब्दशोध पाटी



## शोध व लिही.









| | | | | |
|---|---|---|---|---|
| कॅ | र | म | ट | घ |
| न | ता | ग | र | म |
| ता | ळे | र | बू | घ |
| भा | क | री | ज | म |
| प | प | ई | घ | र |







जसे– मगर

**सूचना :** साधे शब्द तयार करण्यासाठी अक्षरध्वनी जोडून शब्द तयार करून घ्यावे. अशा प्रकारच्या विविध कृतींतून शब्दलेखनाचा सराव करून घ्यावा. विद्यार्थ्यांकडून परिचित शब्दांचे श्रुतलेखन करून घ्यावे.

# ४१. मुळाक्षरे




**सूचना :** विद्यार्थ्यांकडून मुळाक्षरांचे मोठ्या आवाजात वाचन व लेखन करून घ्यावे. अक्षरे ऐकून ओळखण्याचा अधिकाधिक सराव घ्यावा.



बघ व लिही.

# ४२. चौदाखडी

| | ा | ि | ी | ु | ू | े | ॅ | ै | ो | ॉ | ौ | ं | ः |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | का | कि | की | कु | कू | के | कॅ | कै | को | कॉ | कौ | कं | कः |
| ख | | | | | | | | | | | | | |
| ग | | | | | | | | | | | | | |
| घ | | | | | | | | | | | | | |
| च | | | | | | | | | | | | | |
| छ | | | | | | | | | | | | | |
| ज | | | | | | | | | | | | | |
| झ | | | | | | | | | | | | | |
| ट | | | | | | | | | | | | | |
| ठ | | | | | | | | | | | | | |
| ड | | | | | | | | | | | | | |
| ढ | | | | | | | | | | | | | |
| ण | | | | | | | | | | | | | |
| त | | | | | | | | | | | | | |
| थ | | | | | | | | | | | | | |
| द | | | | | | | | | | | | | |
| ध | | | | | | | | | | | | | |

| | ा | ि | ी | ु | ू | े | ॅ | ै | ो | ॉ | ौ | ं | ः |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| न | | | | | | | | | | | | | |
| प | | | | | | | | | | | | | |
| फ | | | | | | | | | | | | | |
| ब | | | | | | | | | | | | | |
| भ | | | | | | | | | | | | | |
| म | | | | | | | | | | | | | |
| य | | | | | | | | | | | | | |
| र | | | | | | | | | | | | | |
| ल | | | | | | | | | | | | | |
| व | | | | | | | | | | | | | |
| श | | | | | | | | | | | | | |
| ष | | | | | | | | | | | | | |
| स | | | | | | | | | | | | | |
| ह | | | | | | | | | | | | | |
| ळ | | | | | | | | | | | | | |
| क्ष | | | | | | | | | | | | | |
| ज्ञ | | | | | | | | | | | | | |

# ४३. पानं



ऐक व म्हण.



गुलाबाचं **पान**,
कातरलंय **छान** ।



आंब्याच्या पानाला,
तोरणात **मान** ।



कमळाच्या पानाला,
लागते **तहान** ।



तुळशीचं **पान**,
केवढुसं **लहान** ।



केवड्याचं **पान**,
हरवतं **भान** ।



केळीचं **पान**,
जेवायला **छान** ।

– सुनीता नागपूरकर

- यमक जुळणारे शब्द लिही.

जसे– पान – छान

लहान .................. .................. भान .................. ..................

**सूचना :** विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक व सामूहिक स्वरूपात कविता तालासुरात व साभिनय म्हणून घ्यावी. यमक जुळणारे शब्द ओळखण्यास सांगावेत व अधिक शब्द लिहून घ्यावेत. विद्यार्थ्यांना फुलांविषयी विविध प्रश्न विचारून बोलते करावे. उदा., (१) तुला कोणकोणत्या झाडाची पाने आवडतात ? का ते सांग.

# ४४. भाज्या व फळे

ऐक व म्हण.



आई : मिनूऽऽ ये. जेवून घे.

मिनू : आज कोणती भाजी?

आई : पालक

मिनू : पालक नको
आजही बटाटाच हवा.

आई : अगंऽ, रोज
एकच भाजी
काय खायची?





पालेभाज्या :
आम्ही पालेभाज्या हिरव्यागार,
खाऊन मिळेल ताकद फार.

**फळभाज्या :**
फळभाज्या खा,
निरोगी राहा.



**फळे :** फळे खा पटपट,
शरीर होईल बळकट.



आमच्याशी आता कर मैत्री,
मिळेल शक्ती देतो खात्री.



**सूचना :** विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. फळभाज्या, पालेभाज्या व फळे खाण्याबाबतच्या चांगल्या सवयी सांगाव्यात.

# ४५. ओळख भाज्यांची



## चित्रे बघ. वाच.



शेपू



मेथी



पालक



कोथिंबीर



## बघ व लिही.

     

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वांगे | काकडी | गाजर | मिरची | बटाटा | भोपळा |
| .................. | .................. | .................. | .................. | .................. | .................. |
| .................. | .................. | .................. | .................. | .................. | .................. |
| .................. | .................. | .................. | .................. | .................. | .................. |



## चित्रे बघ. चित्र व शब्द याची जोडी लाव.




**सूचना :** विद्यार्थ्यांना परिचित फळभाज्या, पालेभाज्या व फळे याविषयी माहिती सांगावी. शब्दांचे अनुलेखन करून घ्यावे व परिचित शब्दांचे श्रुतलेखन करून घ्यावे.

# ४६. माझी ओळख

**माझे नाव**

**माझे वय**

**माझा वाढदिवस**

.............

.............

**माझे गाव**

.............

.............

**माझे मित्र**

.........................

.........................

**माझे आवडते फूल**

.....................

.....................

.....................

.....................

**माझी आवड**

..........................

..........................

..........................

..........................

**माझा आवडता**

रंग

..........

..........

पक्षी

..........

..........

खेळ

..........

..........

प्राणी

..........

..........

**सूचना :** विद्यार्थ्यांना आवडीचे मित्र, रंग, पक्षी आणि खेळ यांचे लेखन करण्यास मदत करावी.

प्रिय विद्यार्थी मित्रांनो आणि मैत्रिणींनो,

जर तुम्हांला कोणी अयोग्य रीतीने स्पर्श केल्यामुळे तुम्ही अस्वस्थ झाला असाल, तर तुम्ही अजिबात गप्प बसू नका. अशी घटना घडल्यास, तुम्ही खालील गोष्टी करणे आवश्यक आहे.

१) स्वतःला दोष देऊ नका.

२) तुमचा ज्यांच्यावर विश्वास आहे, त्यांना घडलेल्या घटनेबद्दल सांगा.

३) तुम्ही पोक्सो ई-बॉक्सद्वारे तुमच्या हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापन केलेल्या राष्ट्रीय आयोगाला देखील कळवू शकता.

**जेव्हा तुम्हांला कोणी अयोग्यरीत्या स्पर्श करतो, तेव्हा तुम्हांला वाईट वाटू शकते, तुम्ही गोंधळून जाऊ शकता, तुम्हांला असहाय्य वाटू शकते; पण तुम्हांला 'वाईट' वाटण्याचे काहीच कारण नाही, कारण यात तुमचा दोषच नाही.**




**हे बटण दाबा.**

**POCSO हा e-box ncpcr@gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

**जर तुमचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असेल. तुम्हांला कोणी त्रास दिला असेल आणि तुम्ही गोंधळलेले असाल, पीडित असाल, तणावात असाल अथवा अशा प्रकारचा त्रास सहन करणारे कोणी मूल तुमच्या माहितीत असेल, तर १०९८ (दहा नऊ आठ) ला संपर्क साधा. त्यामुळे आपले व मित्रांचे जीवन बदलू शकते.**




चाइल्ड लाइन १०९८ (दहा नऊ आठ) : ही एक २४ तास टोल फ्री राष्ट्रीय आपत्कालीन फोन सेवा आहे. महिला आणि बालविकास आपत्कालीन मंत्रालयातर्फे, पीडित मुलांसाठी राबविला जाणारा, चाइल्ड लाइन फाउंडेशनने सुरू केलेला हा उपक्रम आहे.

नए समाज की ओर
Towards a new dawn

• **विद्यार्थ्यांना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श ओळखण्यासाठी त्यांच्या वयोगटांनुसार शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या मार्गदर्शन करावे.**




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

शिकू मराठी आनंदाने इयत्ता पहिली
(इंग्रजी माध्यमासाठी )

(विनामूल्य वितरणासाठी)

समग्र शिक्षा
Samagra Shiksha